CMYK

बीड । रविवार

११.०५.२०२५

वर्षे : ५ अंक : ४०

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 पान:१




# अखेर भारत-पाकिस्तानमध्ये युद्धविराम; भारताकडून अधिकृत घोषणा



**नवी दिल्ली**

भारत आणि पाकिस्तानने पूर्ण आणि तात्काळ युद्धविराम झाला आहे, अशी अधिकृत घोषणा भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी केली आहे. पाकिस्तानचे डीजीएमओ यांनी आज दुपारी ३:३५ वाजता भारताच्या डीजीएमओशी चर्चा केली. त्यानंतर सायंकाळी पाचवाजेपासून दोन्ही बाजूंनी कारवाया थांबल्याचेमिस्त्री यांनी सांगितले. दोन्ही देशांचे डीजीएमओ १२ मे रोजी दुपारी १२ वाजता पुन्हा चर्चा करतील असेही मिस्त्री यांनी यावेळी सांगितले.

ट्रम्प यांची पोस्ट नेमकी काय?- अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हणाले की, भारत आणि पाकिस्तानने युद्धबंदीवर सहमती दर्शविली आहे. ट्रम्प यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत म्हटले आहे की, अमेरिकेच्या मध्यस्थीने रात्रीच्या दीर्घ वाटाघाटींनंतर, मला हे जाहीर करताना आनंद होत आहे की, भारत आणि पाकिस्तानने पूर्ण आणि तात्काळ युद्धबंदीवर सहमती दर्शविली आहे. दोन्ही देशांचे अभिनंदन.

पाकिस्ताननेही केली युद्धबंदीची पुष्टी- पाकिस्तानचे परराष्ट्र ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● डोनाल्ड ट्रम्प यांनी आधीच केली होती घोषणा

**मिस्त्री यांच्या घोषणेपूर्वी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दोन्ही देशांनी युद्धविरामास सहमती केल्याचा दावा केला होता. याबाबत ट्रम्प यांनी एक्सवर पोस्ट केली होती. भारत आणि पाकिस्तानने युद्धबंदीवर सहमती दर्शविली आहे. हे जाहीर करताना त्यांना आनंद होत असल्याचेही ट्रम्प यांनी म्हटले आहे. तर, पाकिस्तानचे उपपंतप्रधान इशाक डार यांनी भारत–पाकिस्तानदरम्यान तात्काळ शस्त्रसंधीची सहमती दर्शवल्याचा दावा केला होता. त्यानंतर आता परराष्ट्र मंत्रालयाकडून याबाबत अधिकृत घोषणा करण्यात आली आहे.**

## लग्नातील डीजे बंद केला, त्याने थेट पोलिस निरीक्षकावरच हात उचलला




**बीड । प्रतिनिधी**

शहरातील बार्शी नाका परिसरात रस्त्यावर मोठ्या आवाजात वाजणारा लग्नातील डीजे बंद केल्याने एकाने पोलिस निरीक्षकांवरच हल्ला केला. यात निरीक्षकांच्या हाताला जखम झाली. ही घटना शुक्रवारी सायंकाळी घडली. याप्रकरणी रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

नवनाथ उडाण (वय ४०, रा. बार्शी नाका, बीड) असे मारहाण करणाऱ्याचे नाव आहे. बार्शी नाका परिसरात एक विवाह सोहळा होता. त्यात डीजे लावला होता. त्याचा आवाज मोठा असल्याने आणि तो रस्त्यावरच वाजत असल्याने गस्तीवर असलेले पेठबीडचे पोलिस निरीक्षक अशोक मुदिराज यांनी तो बंद करण्यास सांगितला. डीजे चालक ऐकत नसल्याने त्यांनी वाहनाची चावी काढून घेतली. यावर नवनाथ हा तेथे आला आणि मुदिराज यांच्याशी हुज्जत घातली. त्यानंतर त्याने त्यांना शिवीगाळ करत ▶▶ उर्वरित पान २ वर

**डीजे बंद केल्याने एकाने शिवीगाळ करत अंगावर आता. त्याला ताब्यात घेतले असून, गुन्हा दाखल केले जाणार आहे. डीजेही जप्त करू. –अशोक मुदिराज, पोलिस निरीक्षक, पेठबीड**

## राज्यात पुढील 4 दिवस मुसळधार पावसाचा इशारा; 15 जिल्ह्यांमध्ये यलो अलर्ट




**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात अवकाळी पावसाचा इशारा अजूनही कायम असून, हवामान विभागाने पुढील चार दिवसांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील विविध जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह पाऊस आणि गारपीट होण्याची शक्यता आहे.

यलो अलर्ट असलेल्या जिल्ह्यांची यादी : १० मे रोजी खालील जिल्ह्यांमध्ये पावसाचा यलो अलर्ट जाहीर करण्यात आला आहे. सातारा, पुणे, नाशिक, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, अमरावती, चंद्रपूर, नागपूर, भंडारा, अहिल्यानगर, यवतमाळ, गोंदिया आणि गडचिरोली.

११ आणि १२ मे रोजी संपूर्ण विदर्भात मुसळधार पावसाची शक्यता असून, नाशिक, पुणे, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यांमध्येही १२ मेला यलो अलर्ट देण्यात आला आहे. तसेच, मुंबई, ठाणे आणि पालघरमध्ये विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस होण्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

पावसामुळे गारपीट व शेतीचे नुकसान : गेल्या काही दिवसांत झालेल्या अवकाळी पावसामुळे राज्यात अनेक भागांतील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. विशेषतः गारपिटीमुळे भाजीपाला, फळबागा आणि रब्बी हंगामातील पिकांना मोठा फटका बसला आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

भारतीय हवामान विभागाने यंदा मान्सून वेळेआधी म्हणजे १३ मेच्या आसपास अंदमान–निकोबार बेटांवर दाखल होण्याचा अंदाज वर्तवला आहे. यंदा ▶▶ उर्वरित पान २ वर

## शिवसेनेने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरास देशाभिमान दाखवत मुस्लिम तरुणांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद: उल्हास गिराम



**बीड । प्रतिनिधी**

पाकिस्तानी दहशतवाद्या विरोधात भारतीय सैन्यानी सुरु केलेल्या युद्धात शहीद भारतीय जावनाच्या शौर्याप्रति सदभावना म्हणून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी आज बीड शहरांत रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरास देशाभीम असणाऱ्या तरुणांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला. विशेष म्हणजे मुस्लिम बांधवानी ही रक्तदान करून देशाप्रति सदभावना दाखवली. याशिबिरास सह संपर्क प्रमुख बाळासाहेब अंबुरे, दैनिक झुंजार नेता चे संपादक अजित वरपे, दैनिक सामना चे जिल्हाप्रतिनिधी उदय जोशी सर, जिल्हा संघटक नितीन धांडे, उपजिल्हाप्रमुख हनुमंत जगताप, कर्मवीर ▶▶ उर्वरित पान २ वर

## श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे सोमवार रोजी विष्णु महाराज आंतरकर यांचे कीर्तन

**बीड । प्रतिनिधी**

विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २७ व्या वर्षातील नववी पुण्यतिथी वैशाख शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. विष्णु महाराज आंतरकर श्रीक्षेत्र देवाची आळंदी यांचे सोमवार दिनांक १२ मे २०२५ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे



गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी ▶▶ उर्वरित पान २ वर

## वाढीव टप्पा निधीची अर्थसंकल्पात तरतूद करा

### बीड जिल्हा विनाअनुदानित कृती समितीचे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री अर्थमंत्री आणि शिक्षणमंत्र्यांना निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

सध्या सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात १४ ऑक्टोबरच्या निर्णयाची अंमलबजावणी करून टप्पा वाढीसाठी निधी मंजूर करा अशी मागणी बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री अर्थमंत्री आणि शिक्षणमंत्री यांना देण्यात आलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली. १४ ऑक्टोंबरच्या शासन निर्णयानुसार वाढीव टप्पा अनुदानासाठी महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा संघटनेच्या वतीने गेली पाच महिन्यांपासून सर्वोतोपरी प्रयत्न केले जात आहेत. परंतु सरकारने मात्र विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांच्या टप्पा वाढ अनुदानाची मागणी ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीडजवळ भीषण अपघात, कारची लक्झरी बसला धडक; १५ वर्षीय मुलासह वडील ठार



**पाटोदा । प्रतिनिधी**

राज्यातील रस्ते अपघाताचे प्रमाण गेल्या काही वर्षात वाढल्याचे पाहायला मिळत असून केंद्रीय दळणवळणमंत्री नितीन गडकरी यांनी देखील याबाबत चिंता व्यक्त केली होती. वर्तमानपत्रात किंवा माध्यमांमध्ये सातत्याने अपघाताच्या बातम्या येत असून महामार्गावरच हे अपघात घडत असल्याचे दिसून येते. आता, बीड जिल्ह्यातील पाटोद्याजवळ एका भीषण अपघातात वडिल ▶▶ उर्वरित पान २ वर

## रुग्णालयाबाहेरील झाडाला रुग्णाने गळफास घेतला, खिशातून मोबाइल पडला अन् जीव वाचला




**बीड । प्रतिनिधी**

उपचारासाठी आलेल्या एका रुग्णाने अपघात विभागाच्या समोरील झाडाला रुमालाने गळफास घेतला. लटकताच खिशातील मोबाइल खाली पडला अन् लोकांनी आरडाओरडा केला. त्यानंतर सुरक्षा रक्षक धावते आणि झाडावर चढून त्याला वाचविले त्यानंतर अपघात विभागात दाखल करून उपचार केले. हा प्रकार शुक्रवारी दुपारी ४ वाजता जिल्हा रुग्णालयाच्या परिसरात घडला. गळफास घेण्याचे कारण मात्र, समजू शकले नाही.

नामदेव रगडे (अंदाजे वय ४०, रा. वांगी, ता. बीड) असे या रुग्णाचे नाव आहे. नामदेव हे शुक्रवारी दुपारी जिल्हा रुग्णालयात आले. ▶▶ उर्वरित पान २ वर



# प्रेम व निस्वार्थ मायेचा वटवृक्ष म्हणजेच माय!

आईचा मानसन्मान व्हावा या उद्देशाने जगात दरवर्षी मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारला मातृदिन (मदर्स डे) साजरा केला जातो.त्या अनुषंगाने यावर्षी मातृदिन ११ मे २०२५ रविवारला येत आहे. त्यामुळे पितृत्व आणि मातृत्व या परीभाषांशी किती जवळच आणि रक्ताच नात असते हे आपल्याला आई–वडील या शब्दावरूनच सहज समजून येते.या जगात माय–बापा शिवाय कोणीही मोठा नाही.

आई–वडील,माय–बाप या शब्दाला सुध्दा कुठेही तोड नाही. कारण आई–वडील हा शब्द फक्त मानवजाती पुरताच सीमित नसून संपूर्ण जीवसृष्टी, पशुपक्षी व जीवजंतू या शब्दाशी निगडित आहे. तेव्हाच आपल्याला उत्पत्ती, संस्कार,संस्कृती, जडणघडण,रहनसहन सर्वत्र दिसून येते.ज्याप्रमाणे आई – वडील मुलांची जोपासना करते. त्याचप्रमाणे पशुपक्षी व संपूर्ण जीवसृष्टी आपल्या पिल्लांची(मुलांची)जोपासना करून लहाण्याचे मोठे करतात.ही ईश्वरी देणच आहे.त्यामुळे या जगात आई–वडीला पेक्षा कोणीही मोठा नाही हेही तितकेच सत्य आहे.कारण वडीलांवर आपल्या मुलांचीच नाही तर संपूर्ण कुटुंबाची मोठी जबाबदारी असते.त्यामुळे आर्थिकदृष्ट्या व इतर बाबतीत सुरक्षेची ढाल बनून वडील आपले कार्य तत्परतेने करीत असतो.त्यामुळे आई–वडीलांची भुमिका समान असते. आई नेहमी मायेच पांघरूण घालत असते तर वडील पहाडासारखा संपूर्ण कुटुंबाची रक्षा करून सुरक्षा कवचची भुमिका निभवत असतो.सर्वांनीच आई–वडीलांची सेवा व सन्मान करायला हवा.आईचा मानसन्मान करून पितृ दिवस हा तर दररोज साजरा करायला पाहिजे.परंतु जगाला जान रहावी म्हणून ठराविक दिवशी मातृदिनला महत्व आहे.पितृ दिन असो किंवा मातृ दिन दोन्ही दिवस एकसमानच असतात यात यत्किंचितही फरक नाही.फक्त जबाबदाऱ्या वेगवेगळ्या असतात त्यामुळे मुल–मुली यांच्या केसालाही धक्का लागणार नाही याची काळजी नेहमी घेऊन तत्परता दाखवित असतात. कारण मातृदिनाचा इतिहास १८६० या दशकाशी संबंधित आहे. त्यामुळे सर्वप्रथम मातृदिनाची सुरूवात १९०८ साली अमेरिकेतुन झाली. यानंतर पितृदिनाची मागणी व्हायला लागली व अधिकृतपणे १९१० ला पितृदिनाला सुरूवात झाली. मात्र पितृदिन साजरा करण्याच्या तारखांमध्ये मतभेद आहेत.मातृत्व दिन(मदर डे) प्रमाणेच वडिलांचा आदर सन्मान व्हावा व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पितृदिन (फादर डे) साजरा केला जातो.जगात आई–वडील या शब्दाला सुध्दा तोड नाही.



कारण जगातील कोणतीही भाषा असो मामा–मामी, काका–काकु,माऊशी,आत्या इत्यादी अनेक नाते आहेत व यासाठी वेळोवेळे शब्दप्रयोग सुध्दा आहेत.परंतु जगातील कोणत्याही कानाकोपऱ्यात जा तुम्हाला आई–वडील यांच्यासाठी एकच शब्द दिसेल.उदाहरण द्यायचे झाले तर आई–बाबा, मम्मी–पप्पा अशाप्रकारे जगात एकच शब्द आपल्याला आई–वडीलांसाठी दिसून येईल ही एक सृष्टीची लिलाच म्हणावी लागेल.मानवी नातेसंबंध आणि जगातील वेगवेगळ्या नात्यातील एक नातं म्हणजे आई–वडिलांच नात. वडीलांच आणि मुलांचे नाते म्हणजे समुद्रातील पाण्यासारख अफाट असते.कारण प्रत्येक आई मुलांना घडवीते सुसंस्कृत करते पदोपदी मुलांची काळजी घेते यातच मातृत्व दडलेले दिसून येते.कारण आई मुलांच्या सानिध्यात चोवीस तास असते. त्यामुळे आपले मुल काय करीत आहे आणि आपण त्यांच्यासाठी काय केले पाहिजे याची सटीक चाहूल आईला कळत–नकळत कळते व त्यापध्दतीने मुलांचे संगोपन करीत असते.आई अशी दैवी शक्ती आहे की आकाश पाताळ एक करते.परंतु मुलाला कधीच उपाशी ठेवत नाही. आई घरातील सर्वांचे जेवण झाल्यावरच जेवण करीत असते. आई–वडीलांच नातं या भुतलावर अफाट असुन न–भूतो–न–भविष्यती अशाप्रकारचे हे नाते आहे.कारण वडिल भुक–तहान विसरून आपल्या कुटुंबाकरीता राबत असतो व घरग्रहस्ती चालवीतो. म्हणजेच घराला आर्थिक बळ देण्याचे काम वडिल करीत असतात तर वडिलांनी केलेल्या कमाईच्या आधारे घर चालवण्याची मोठी जबाबदारी आईची असते.कारण मोजक्या पैशात आईला घर चालवायचे असते.म्हणजे घरात काय कमी जास्त आहे हे सर्व आईलाच पहावे लागते व ही तीची मोठी कसोटीची परिक्षा असते. समाजात आईच्या कार्याला तोड नाही व वडिलांच्या कर्तुत्वाला कोणीही मात करू शकत नाही. म्हणुन सर्वांनीच लक्षात ठेवले पाहिजे की आपले खरे गुरु व दैवत आई–वडीलच आहे त्यामुळे आजच्या तरुण पिढीने आई–वडीलांना प्रथम स्थानावर ठेवले पाहिजे.आई या शब्दाला किती महत्त्व आहे हे आपण या ओवी वरून समजू शकतो. आई माझा गुरु,आई कल्पतरू सुखाचा सागर आई माझी, प्रीतीचे माहेर, शांतीचे आगर मांगल्याचे सारं आई माझी. म्हणजे आईविना जग नाही व वडीलांविन आधार नाही. आपल्याला थोडीशी जरी इजा किंवा दुर्घटना झाली तर मुलं आईग म्हणून किंचाळतो तेव्हा आईच्या रूपात कोणीना–कोणी अवश्य धावुन येतोच ही दैवी शक्ती आई या शब्दात आपल्याला दिसुन येते.या उलटं वडिलांचे आहे.एखादी मोठी दुर्घटना घडली तर प्रत्येक व्यक्ती बापरे म्हणून जोरांनी ओरडतो अशा वेळी ताबडतोब आजुबाजुला असलेले नागरिक वडिलांची भूमिका बजावतात. म्हणजेच वडील तीथे नसतांना सुध्दा तेथील संपूर्ण नागरिक वडिलांची भूमिका बजावतात. अशा वेळी आपणही म्हणतो की लोक देवासारखे धावुन आले. म्हणजे आईग आणि बापरे या कठीण शब्दांसामोर सर्वसामान्य माणूस आपल्या आई–वडिलांची भुमिका बजावतात व दैवी रूपाने मदतीला धावून येतात. मानवजातीमध्येच ज्याप्रमाणे आईची भूमिका असते त्याचप्रमाणे संपूर्ण पशुपक्षी व जीवसृष्टीमध्ये आईची भूमिका अग्रगण्य असल्याचे आपल्याला दिसून येते.कारण मुलांच्या आयुष्यात नेहमीच ती सुर्याच्या प्रकाशाप्रमाणे वावरत असते जेणेकरून मुलांच्या आयुष्यात कुठेही अंधक्कार पडणार नाही याची काळजी घेत असते.कारण आई आपल्या मुलांसाठी आपल्या जीवाचा आटापिटा करून मुलाला लहाण्याचा मोठा करते.त्यामुळे आज सर्वांचीच प्रथम जबाबदारी आहे की आपल्या आई–वडिलांची सेवा करने,पालनपोषण करणे, त्यांच्या प्रकृतीची काळजी घेणे व त्यांच्या वेदना जाणुन घेऊन त्यांवर उपाययोजना करणे आणि आई–वडीलांना सुखी व समाधानी ठेवणे यातच आपल्याला खरा जागतिक मातृदिन दीसुन येईल.माझ्यामते मातृदिन ठराविक दिवशीच का साजरा करावा.दररोज साजरा का करू नये ? मी तर म्हणेन की मातृत्व–पितृत्व दिवस हा दररोज आई–वडीलांची सेवा करून साजरा केला पाहिजे व आपण ते दिवस आठवायला पाहिजे की आपल्याला लहाण्याचे मोठे करण्यासाठी आईने कीती यातना व दु:ख सहन केले असावे.याची जाणीव आज मुलांनी ठेवण्याची गरज आहे. कारण आईने आपल्याला वटवृक्षाच्या छायेत लहाण्याचे मोठे केले व याच वटवृक्षाचा पहारेकरी म्हणून वडिलांनी आपली चोख भुमिका बजावली. आई– वडीलच्या तत्परतेमुळेच मुलांच्या केसालाही धक्का लागत नाही ही दैवी शक्तीच म्हणावी लागेल.मातृदिनाच्या निमित्ताने मी सर्वांना हेच सांगु इच्छितो की आपण सर्वांनी भारतीय संस्कृतीच जपायला हवी यातुनच आपल्याला खऱ्या अर्थाने आई–वडीलांची सेवा करता येईल.पाश्चिमात्य देशात आई–वडील सोडून इतर नातेसंबंध अंकल व टी या दोन शब्दात संपुष्टात आली आहे.परंतु भारतीय संस्कृतीत आजी, आजोबा,काका, काकु,मामा,मामी, मावशी,आत्या इत्यादी अनेक वेगवेगळे शब्द आपल्याला वेगवेगळ्या नात्यांप्रमाणे दिसून येतात त्यांचा सन्मान व्हायलाच पाहिजे.त्यामुळे अंकल–न्टी हे पाश्चिमात्य शब्द विसरायला हवे.त्याचबरोबल मम्मी–पप्पा या शब्दांना पुर्णविराम देऊन आई–बाबा असे शब्द ऐकू आले तर भारतीय संस्कृतीचा सन्मानच अवश्य होईल असे मला वाटते.सध्याच्या काळात काही मुल–मुली आई–वडिलांची सेवा करण्यास असमर्थ दिसून येतात अशा परिस्थितीत आई–वडिलांना वृध्दाश्रमाच्या खाईत लोटतात हेही आई–वडिलांच्या प्रती दुर्भाग्यच म्हणावे लागेल.परंतु असे व्हायला नको असे मला वाटते.आपण ११ मे ला मातृदिन (मदर्स डे) साजरा करीत असतांना पृथ्वी मातेचाही थोडासा विचार करायला हवा.कारण आज पृथ्वीची जोपासना होत नसल्याने दिवसेंदिवस हवामानात बदल होत आहे.याकरीता जागतिक मातृदिनाचे औचित्य साधून प्रत्येक मुलांनी आई–वडीलांच्या आठवणीत रहावे यासाठी आजच्या दिवशी एकतरी वृक्ष लावले पाहिजे.यामुळे एकाच दिवशी देशासह संपूर्ण जगात लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड झाल्याचे आपल्याला दिसून येईल.यामुळे पृथ्वीचे संतुलन स्थिर रहाण्यास मोठी मदत होईल व आई–वडीलांना निसर्गाचा आनंद घेता येईल.

## पान ४ वरून पुढे...

### आज विद्रोही ...

यांची उपस्थिती असणार आहे. या जलसा कार्यक्रमास मार्गदर्शक म्हणून आर.एस.गायकवाड, महेंद्र शिंदे, विजय आगलावे, संदीप जोगदंड यांची उपस्थिती असणार आहे. या जलसा कार्यक्रमास हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सम्यक प्रतिष्ठाणचे अध्यक्ष तथा बहुजन विकास मोर्चाचे जिल्हाध्यक्ष प्रशांत ससाणे यांनी केले आहे. प्रत्येक वर्षी प्रमाणे याही वर्षी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून देशातील जात वर्ग–स्त्री दास्य (गुलामगिरी) अंताची विद्रोही गाणी, फुले–शाहू–आंबेडकरांचे विचार घरा–घरात पोहचविण्यासाठी डफावर थाप आणि विद्रोही सुर घेऊन विद्रोही आंबेडकर जलसा हा भिमगीत व प्रबोधनांचा कार्यक्रम आयोजित केला आहे. या कार्यक्रमास उपस्थित रहावे जेणे करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व कार्य समाजातील तळागळातील प्रत्येक वंचित घटकापर्यंत पोहोचतील यासाठी सहपरिवार उपस्थित रहावे असे आवाहन सम्यक प्रतिष्ठाणचे अध्यक्ष प्रशांत ससाणे यांच्यासह शांतीदूत घोडके, वैभव वाघमारे, सचिन ससाणे, रोहन साळवे, सिध्दार्थ जोगदंड, अशोक हुंबरे, किरण ससाणे, प्रफुल गायकवाड यांनी केले आहे.

### देशभक्तांनी मोठ्या....

उद्धवस्त केले. पहलगामच्या हल्ल्यातील नागरिकांच्या जखमा ओल्या असताना क्षणार्धात पाकिस्तानात घुसून आपल्या भारतीय भुदल,नौदल आणि हवाईदलाच्या जांबाज आधिकाऱ्यांनी आणि जवानांनी दाखविलेल्या साहसाला आणि धैर्याला सलाम करून खरोखरचं देशप्रेमाची भावना जागी करण्यात आली. यामुळे बीडमध्ये उद्या दि. ११ मे रोजी सकाळी १० वाजता तिरंगा रॅली काढून भारतीय जवानांचे मनोबल वाढविण्यात येणार आहे. सकाळी १० वाजता महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यापुतळ्यापासून दुचाकी रॅलीला सुरुवात होणार आहे. माळीवेस, सुभाष रोड, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौक मार्गे छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ रॅलीचा समारोप करण्यात येणार आहे. यामध्ये देशभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शेख निजाम,शेख अमर,कय्युम इनामदार,सय्यद फईम,जयंत वाघ, सत्तार इनामदार,सय्यद आझम,शेख जाकीर,शेख नसिर यांनी केले आहे.

### द्वारकधीश मित्र...

पाकिस्तानवर एअरस्ट्राइक करत प्रत्युत्तर देऊन अनेक दहशतवादी अड्डे उद्धवस्त केले. पहलगामच्या हल्ल्यातील नागरिकांच्या जखमा ओल्या असताना क्षणार्धात पाकिस्तानात घुसून आपल्या भारतीय भुदल,नौदल आणि हवाईदलाच्या जांबाज आधिकाऱ्यांनी आणि जवानांनी दाखविलेल्या साहसाला आणि धैर्याला सलाम करून खरोखरचं देशप्रेमाची भावना जागी करण्यात आली. यामुळे बीडमध्ये उद्या दि. ११ मे रोजी सकाळी १० वाजता तिरंगा रॅली काढून भारतीय जवानांचे मनोबल वाढविण्यात येणार आहे. सकाळी १० वाजता महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यापुतळ्यापासून दुचाकी रॅलीला सुरुवात होणार आहे. माळीवेस, सुभाष रोड, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौक मार्गे छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ रॅलीचा समारोप करण्यात येणार आहे. यामध्ये देशभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आव्हान द्वारकाधीश मित्र मंडळाने केले आहे.

### गेवराईच्या आगारात...

आ विजयसिंह पंडित यांच्या उपस्थितीत लालपरी बसचे विधिवत पूजन करून प्रवाशांच्या सेवेसाठी सुपूर्द करण्यात आल्या. नवीन बस उपलब्ध झाल्यामुळे प्रवाशांना मोठ्या प्रमाणावर सुविधा मिळणार आहेत. या प्रसंगी आ. विजयसिंह पंडित यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार, आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे आभार व्यक्त केले. दरम्यान आमदारासाठी राखीव असलेल्या आसनावर बसून आमदार यांनी काही किलोमीटर प्रवास केला.

### हिंदू-मुस्लिमांचं...

हजरत मौलाली बाबांची दर्गाह आहे.दरवर्षी सर्वधर्मिय ग्रामस्थ एकत्रितपणे खेळीमेळीच्या वातावरणात हा उत्सव साजरा करतात. व्यवसाय,नोकरीनिमित्त बाहेरगावी गेलेले नागरिक बाबांच्या यात्रेच्या निमित्ताने आवर्जून हजेरी लावतात.बुध्द पौर्णिमेला यात्रेला सुरूवात होते. पौर्णिमेच्या अगोदर येणा–या बुधवारी हजरत मौलाली बाबांना संदल लावतात.यावर्षी सोमवारी दि.१२ मे रोजी यात्रा–उरूस असून सर्व ग्रामस्थ एकत्रित येऊन बाबांची सवाद्य छबीना मिरवणूक काढतात.बाबांच्या समाधीला फुलांची चादर अर्पण करून श्रीफळ, मलिदा ,गुळ–खोब–याच्या शेरणीचा प्रसाद दाखवून भाविक–भक्त आपली इच्छापुर्ती करतात. त्याच दिवशी पहाटेच्या दरम्यान शोभेच्या रंगीत फटाक्यांची आतिषबाजी लक्षवेधी असते.हा नेत्रदीपक सोहळा पाहण्यासाठी महिला,पूरूष, बालगोपाळ देखील सहभागी होतात.तर दुस–या दिवशी नामवंत मल्लांच्या कुस्तीची दंगल आयोजित करण्यात येते.नदीकाठी थाटलेल्या विविध दुकानांना विद्युत रोषणाईने सजविण्यात येते.यात्रेत आलेली मनोरंजनाची साधने यात्रेकरूंची लक्षवेधुन घेतात.कडयाची यात्रा म्हणजे हिंदू –मुस्लिम बांधवांच्या एकतेचं प्रतीक मानली जाते, यातूनच सामाजिक एकोप्याचे दर्शन अनुभवायला मिळते.

### जातीपाती विसरून...

बीडच्या श्रीक्षेत्र नेकनूर येथे वारकरी संप्रदायातील महान संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवास चौथ्या दिवसाचे कीर्तन पुष्प महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार श्री ह भ प चैतन्य महाराज निंबोळे नाशिक कर यांचे संपन्न झाले. यावेळी त्यांनी यारे नाचु प्रेमानंदे । राम नामाचेनी छंदे ।। म्हणा जयराम श्रीराम । भवसिंधु तारक नाम ।। ऐसी नामाची आवडी । काळ गेला देशोधडी ।। आवडीने नाम घोका । म्हणे जनार्दन एका ।। या संत एकनाथ महाराजांच्या अभंगावर चिंतन मांडले.हा अभंग आवाहन करणारा आहे. आज खऱ्या अर्थाने एकत्र होण्याची गरज आहे. कली युगात संघटन महंत्वाचे आहे..हिंदू नावाखाली एकत्र येताना जात पात विचारू नका. सर्वजण हिंदू आहोत म्हणून एक या असे आवाहन महाराजांनी केले.

### शिवणीमध्ये बुद्ध...

कलेक्टर विवेक जॉन्सन, सीईओ आदित्य जीवने, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त प्रदिप भोगले, नायब तहसीलदार सुहास हजारे, समाज कल्याण अधिकारी दत्तात्रय क्षीरसागर, अभियंता व्ही.एल.कांबळे, संपादक कुणाल कांबळे असणार आहेत. विशेष अतिथी म्हणून एमएसआरडीसी मुंबईचे व्यवस्थापकीय संचालक इंजि.अनिल गायकवाड उपस्थित असणार आहेत. दरम्यान बुद्ध जयंती महोत्सवात उपस्थित रहावे असे आवाहन मुख्य संयोजक भिक्खु धम्मशिल थेरो यांनी केले आहे.

## पान १ वरून पुढे...

### अखेर भारत...

मंत्री इशाक दार यांनी एक्स वर पोस्ट केली आहे. यात त्यांनी पाकिस्तान आणि भारत यांनी तात्काळ प्रभावीपणे युद्धबंदीवर सहमती दर्शविली आहे. तथापि, भारतावर हल्ला करण्याच्या अयशस्वी प्रयत्नांबद्दल त्यांनी माफी मागितली नाही. त्यांनी पुढे असा दावा केला की, पाकिस्तानने नेहमीच आपल्या सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडतेशी तडजोड न करता या प्रदेशात शांतता आणि सुरक्षिततेसाठी प्रयत्न केले आहेत.

### लग्नातील डीजे...

कॉलर पकडली. त्यानंतर निरीक्षकांवर हल्लाही केला. यात मुदिराज यांच्या उजव्या हाताला जखम झाली. शिवाय चष्मा तुटता, नेमप्लेटही खराब झाली. या प्रकारानंतर जमाव जमला. मुदिराज यांनी तातडीने आपल्या ठाण्यातील कर्मचारी बोलावून घेत नवनाथला ताब्यात घेतले. सायंकाळी ७:०० वाजेपर्यंत त्याला बार्शी नाका पोलिस चौकीतच बसवून ठेवले होते. त्याच्यावर गुन्हा दाखल केला जाणार असल्याचे मुदिराज यांनी सांगितले.

डीजे बंद करून सुसाट– ज्या डीजेची चावी काढून घेतली, त्याने दुसरी चावी वापरून सुसाट वेगाने निघून गेला. हा डीजे जामखेड येथील असल्याचे सांगण्यात आले. त्याचा क्रमांकही पोलिसांनी घेतला आहे. तो डीजे ताब्यात घेतला जाणार असल्याचेही मुदिराज म्हणाले.

एसपी कॉवत माझे मित्र– पोलिसांनी नवनाथला ताब्यात घेतल्यानंतर तो दारूच्या नशेत असल्याचे सांगण्यात आले. एसपी नवनीत कॉवत माझे मित्र आहेत. माझ्या महाराष्ट्रात ओळख आहेत. एका राजकीय पक्षाचा जिल्हाध्यक्षही माझा नातेवाइक आहे. माझा चुलत भाऊ नगरसेवक आहे, माझे कोणीच काही करू शकत नाही, अशा धमक्याही तो चोकीत बसून पोलिसांनाच देत होता. गुन्हा दाखल

### राज्यात पुढील...

उन्हाळ्यात तब्बल ५० दिवस उष्णतेची लाट अनुभवली गेल्याने, लवकर येणारा मान्सून नागरिकांसाठी दिलासा ठरू शकतो.

### शिवसेनेने आयोजित...

परिवाराचे सोमनाथ धांडे, गणेश जाधव, राहुल जामकर, नंदकुमार येवले, सुरेश तात्या शेटे, माजी नगरसेवक सुधीर भांडवले, यांनी भेट दिली. या शिबिरास उपजिल्हाप्रमुख संजय महाद्वार, लक्ष्मण बहिरवळ सुशील पिंगळे, रतन तात्या गुजर, नवनाथ प्रभाळे, सरपंच प्रदीप कोटुळे, अतुल लोणकर, योगेश वादे, अझर सय्यद, ज्ञानेश्वर दाभाडे, सुजित गिराम, गिरीश गिराम, वैभव प्रभाळे, महेश भोसले, सौरभ इंगोले यासह अनेक तरुणांनी रक्तदान शिबिरास सहभाग नोंदवला.

### श्रीक्षेत्र गोरक्षनाथ...

जुजगव्हाण यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

### वाढीव टप्पा...

गांभीर्याने न घेता सातत्याने दुर्लक्षित करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या सर्व राज्यातील विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने ८ मार्च जागतिक महिला दिनी संपूर्ण राज्यासह बीड जिल्ह्यात जेल भरो आंदोलन आयोजित करण्यात आले होते. या आंदोलनासाठी बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी पोलिसांकडे रीतसर परवानगी मागितली परंतु पोलिसांनी बीड जिल्हा विना अनुदान शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांना जेलभरो आंदोलनासाठी परवानगी नाकारली. पोलिसांनी जेलभरो आंदोलनाला परवानगी नाकारल्या नंतर आंदोलनाच्या भूमिकेवर ठाम असलेल्या विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांना जिल्हाधिकारी यांच्यामार्फत शांततेच्या सनदशीर मार्गाने आपल्या मागण्यांच्या संदर्भातल्या शासनाला निवेदन सादर करण्याची पोलिसांनी विनंती केली. पोलिसांच्या या विनंतीला मान देऊन मराठवाडा विभागाचे विभागीय अध्यक्ष वैजनाथ चाटे, छत्रपती संभाजी नगर विभागाचे कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे, छत्रपती संभाजी नगर विभागाचे निरीक्षक विजयसिंह शिंदे बीड जिल्हा अध्यक्ष आत्माराम वाव्हळ, बीड तालुकाध्यक्ष भागवत यादव यांच्या सह जिल्हा कार्यकारणी सदस्य विश्वनाथ मुंडे आणि महेंद्र वाघमारे

यांनी जिल्हाधिकारी यांच्या दालनामध्ये जिल्हाधिकारी यांचे प्रतिनिधी यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, दुसरे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार आणि शिक्षणमंत्री दादा भुसे यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनावर बीड जिल्हा शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

दरम्यान बीड जिल्ह्यासह राज्यातील सर्व विनाअनुदानित अंशतः अनुदानित शाळेत काम करणाऱ्या शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे उद्या सादर होणाऱ्या अर्थसंकल्पाकडे लक्ष लागले आहे.

### बीडजवळ भीषण...

आणि मुलाचा दुर्दैवी अंत झाला आहे. दरम्यान, दोघांचेही मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठविण्यात आले आहेत.

बीडच्या पाटोदा शहराजवळ पुण्याहून केजकडे जाणारी भरधाव वेगातील कार पुलाच्या कठड्याला धडकून ट्रॅव्हल्सवर जाऊन आदळली. या अपघातात अश्फाक शेख (४० वर्षे) आणि त्यांचा मुलगा अल्ताफ शेख (१५ वर्षे) हे दोघेही जागीच ठार झाले आहेत. पुण्यावरुन हे दोघेही आपल्या गावी म्हणजेच केजकडे येत होते. मात्र, पाटोदाजवळ आले असता त्यांच्या कारचा अपघात झाला. चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने ती कार पुलाच्या कठड्याला धडकली. त्यानंतर तीन पलट्या खाऊन समोरून येणाऱ्या एका खासगी कंपनीच्या ट्रॅव्हल्सवर जाऊन आदळली. त्यात कारमधील दोघांचाही मृत्यू झाला. दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच पाटोदा पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत कारमधून मृतदेह बाहेर काढले. त्यानंतर, मृतदेह पाटोदा ग्रामीण रुग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी दाखल करण्यात आले. याप्रकरणी अधिक तपास पोलीस करत आहेत.

### रुग्णालयाबाहेरील झाडाला...

अपघात विभागासमोरच जुने वडाचे झाड आहे. त्या ठिकाणी ते काही वेळ थांबले. याच झाडाखाली रुग्णांच नातेवाईक जेवण करतात. तसेच सावली असल्याने गप्पा मारत असतात. त्यामुळे येथे कायम गर्दी असते. ही गर्दी कमी होताच नामदेव यांनी संरक्षक भिंतीच्या बाजूने झाडावर चढले. आपल्या गळ्यातील भगवा रूमाल फांदीला बांधला. फांद्यामुळे ते कोणाला दिसले नाही. त्यानंतर गळफास लावून लटकताच ते थोडे आडवे झाले आणि वरच्या खिशातील मोबाइल खाली पडला. बाजूच्या लोकांनी जाऊन पाहिल्यावर आरडाओरडा केला. त्यानंतर तेथील सुरक्षा रक्षक धावले आणि झाडावर चढून त्यांना अलगद वर उचलले. इतर लोकांनी मदत करून गळ्याचा फास काढत त्यांना खाली उतरवत अपघात विभागात दाखल केले. त्यांच्यावर अपघात विभागातच उपचार सुरू असून प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात आले.

सीएस, एसीएसचीही धाव– गळफासाची माहिती समजताच ऑनलाइन बेठकीत असलेले जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संतोष शहाणे, डॉ. एस. आर. तांदळे, डॉ. हनुमंत पारखे यांनी धाव घेतली. अपघात विभागातील डॉक्टरांच्या मदतीने त्यांच्यावर उपचार केले. त्यामुळे रगडे यांना जीवदान मिळाले. काही वेळ अपघात विभागातच उपचार केल्यानंतर आयसीयू विभागात दाखल करू, असे आरोग्य विभागाने सांगितले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# मांडे-आमरसाच्या मेजवानीने भाविक तृप्त

**आळंदी । प्रतिनिधी**

गोपाळ काल्याचे कीर्तन.... अन् आमरस मांडे भोजनाच्या महाप्रसादाने शनिवारी (ता. १०) गेली आठ दिवस सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता सोहळा मोठ्या भक्तिभावाने हजारो भाविकांच्या उपस्थितीत झाला.

मांडभोजनाचा आस्वाद घेऊन आनंदसुख सोहळ्याच्या आणि संत विचारांच्या संस्काराची शिदोरी घेऊन राज्यभरातून आलेले भाविक परतू लागले.संत ज्ञानेश्वर माऊलींच्या ७५० वा जन्मोत्सव सोहळा आळंदीत शनिवारी (ता. ३) ते शनिवार (ता. १०) दरम्यान हजारोंच्या संख्येने भाविक ज्ञानेश्वरी पारायण आणि विविध नाम वंत कीर्तनकार – प्रवचनकार यांच्या




कीर्तन सोहळ्यासाठी आळंदीत आले होते. दरम्यान शुक्रवारी (ता. ९) रात्री इंद्रायणी काठच्या दीपोत्सव झाला. आज सकाळी दहा वाजता आळंदीतील वारकरी संप्रदायातीत उर्ध्वयू शांतीब्रम्ह मारोती महाराज कुल्हेकर यांच्या कीर्तनासाठी मोठी गर्दी झाली होती. देवस्थानच्या कर्मचाऱ्यांनी कीर्तन मंडपात मोठी काता प्रसादाने भरलेली हंडी उभारली होती. हंडी फोडल्यानंतर कालाप्रसाद गोळा करीत उपस्थित भाविकांनी माउलीनामाचा गजर केला आणि आठ दिवसांच्या हरिनाम सप्ताहाची सांगता झाली. त्यानंतर भाविकांची झुंबड उडाली ती आमरस आणि मांडे भोजनाच्या पंक्तीवर. जळगाव जिल्ह्यातून मांडे आणण्यात आले होते. आळंदीतील शेतकरी, व्यापारी, कामगार, राजकीय क्षेत्रातील नागरिकांनी मिळून आमरस, भजी, आमटी, भाताचे जेवण केले होते. आळंदीकर तरुणाई भाविकांना जेवण, नाष्टा देण्यात मग्न होते. महाप्रसादाचे सेवन करून भाविक पुन्हा घरी परतू लागले. आठ दिवस कीर्तन-प्रवचनात मिळालेली संस्काराची शिदोरी घेऊन भाविक माघारी परतले. आळंदी-पंढरीच्या दर्शनाने वैकुंठाचे दर्शन

शातिब्रम्ह मारोती महाराज कुल्हेकर म्हणाले, भगवान परमात्मा भेटल्यानंतर जो आनंद भक्ताला मिळतो, तोच आनंद वारकऱ्यांना पंढरपूरच्या विठ्ठल आणि आळंदीच्या ज्ञानेश्वर महाराजांच्या दर्शनाने मिळतो. तोच आनंद चंद्रभागेच्या वाळवंटात आणि आळंदीच्या इंद्रायणीकाठी मिळतो. खरे तर परमात्मा हा विठ्ठल आणि ज्ञानोबारायांच्या रूपात अवतीर्ण झालेला आहे. वैकुंठ आणि स्वर्गाचा आनंद हा आळंदी-पंढरीच्या दर्शनात असल्याने भक्तीचा समुदाय वारी करतो. आज जगाच्या पाठीवर कोणतेही तत्वज्ञान नाही जे ज्ञानेश्वरीत आहे. संतांचे अभंग तुमचे आमचे जीवन समृद्ध करतात. ज्ञानेश्वरी ग्रंथ चंदनाच्या वृक्षाप्रमाणे सुगंध देतो. ज्ञानेश्वरी पारायण करण्यात मोठा आनंद आहे. भक्तांना खरे ज्ञान देण्याचे काम ज्ञानेश्वरीत असल्याने दररोज त्याचे पारायण होणे आवश्यक आहे. पारायण सोहळ्यासाठी पहिल्या दिवशीची आणि शेवटची अन्नप्रसादाची सोय आळंदीकरांकडे होती. सहा दिवस आमदार शंकर जगताप यांचे बंधू विजय जगताप यांच्याकडे होती. दोन्ही वेळचे अन्नप्रसादासाठीचे जेवण जगताप यांनी दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आळंदीकर ग्रामस्थ, जगताप कुटूंबीयांचा सन्मान करण्यात आला.

## अक्षय भैय्या मुंदडा यांच्या वाढदिवसानिमित्त माजी सैनिकांचा घरोघरी जाऊन केला जाणार सन्मान

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

मुझे तोड़ लेना बनमाली,उस पथ पर देना तुम फेंक! मातृ-भूमि पर शीश- चढ़ाने, जिस पथ पर जावें वीर अनेक! या माखनलाल चतुर्वेदी यांच्या कवितेप्रमाणे देशप्रेम काय असते आणि देशाप्रती समर्पित भावना कशा असाव्यात, हे देशाच्या तिनही सैन्य दलांतील सैनिकांकडून शिकावे. देशासाठी सर्व काही पणाला लावून प्रत्येक युद्धात लढलेल्या माजी सैनिकांचे योगदान फार मोठे आहे. हे सैनिक देशाची शान तर आहेतच त्याचप्रमाणे आम्हा सर्वांचा ते अभिमान आहेत. देशाच्या या खऱ्या संपत्तीचा



येणाऱ्या प्रत्येक पिढीने आदर, मानसन्मान ठेवलाच पाहिजे. माजी सैनिकांचे त्याग मौलाचे ठरते. सेवेत कार्य करत असताना घर परिवाराला मागे ठेवून राष्ट्र प्रथम म्हणत सर्वस्व पणाला लावून लढण्याचे धाडस सैनिक करतात. त्यामुळे खऱ्या अर्थाने सैनिक हे देशाचा मुख्य कणा आहे आणि यासाठीच युवकांचे प्रेरणास्थान, विकासात्मक दूरदृष्टी असणारे युवा नेतृत्व श्रीमान अक्षय भैय्या मुंदडा यांच्या वाढदिवसानिमित्त देशसेवा बजावलेल्या माजी सैनिकांचा व त्यांच्या कुटुंबीयांचा दिनांक ११, १२ व १३ मे घरोघरी जाऊन सत्कार करण्यात येणार आहे अशी माहिती तालमार्तंड प्रकाश बोरगावकर,अंबाजोगाई तालुका भाजपा पश्चिम मंडळ प्रमुख गोकुळ नाना कदम,प्रशांत अदनाक,संतोष (आबा) लोमटे, वैजनाथ ( भैय्या )देशमुख, बालाजी शेरेकर,शशिकांत (नाना ) गायकवाड,राणा चव्हाण, महेश लोंढाळ,महेश अंबाड,राजाभाऊ सोमवंशी, सुनील अडसूळ, शिरीष मुकडे यांनी दिली. युवकांचे हृदय स्थान आणि संवेदनशील युवा नेतृत्व श्रीमान अक्षय भैया मुंदडा यांनी वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेले विविध सांस्कृतिक कार्यक्रम युद्धजन्य परिस्थितीमुळे रद्द करण्यात आले आहेत. परंतु देश सेवा करणाऱ्या माजी आणि आजी सैनिकांप्रती सद्भावना व्यक्त करण्यासाठी घरोघरी जाऊन माजी सैनिकांचा सन्मान करण्यात येणार आहे.

## विद्युत पुरवठा सुरळीत राहील याची दक्षता घ्या : जिल्हाधिकारी

**मान्सूनपुर्व कामे तात्काळ पूर्ण करण्याचे निर्देश**

**नांदेड । प्रतिनिधी**

सध्या नांदेड जिल्ह्याचा पारा ४३ अंशाच्या जवळपास असून हवेत प्रचंड उकाडा वाढला आहे. त्यामुळे ग्राहकांची विजेची मागणी वाढली असून पुरवठा कमी पडत आहे. त्यामुळे वारंवार विज पुरवठा बंद पडण्याच्या घटना वाढल्या आहेत. याबाबत महावितरण विभागाने आवश्यक त्या उपाययोजना करुन विद्युत पुरवठा सुरळीत राहील यांची दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात महावितरण विभागाच्या कामाचा आढावा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी घेतला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, अधिक्षक अभियंता सुधाकर जाधव, कार्यकारी अभियंता विनय बहादूर, रुमदेव चव्हाण, मंगेश बोरगावकर तसेच महावितरण विभागाच्या अधिकारी कर्मचारी आदीची उपस्थिती होती. यावेळी मान्सूमपुर्व कामे प्राधान्याने करा, विजेच्या समस्याबाबत



ग्राहकांशी, नागरिकांशी सुसंवाद ठेवा. उपकेंद्राची रोहित्र क्षमता वाढविण्याचे व मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० तसेच इतर योजनेअंतर्गत उपकेंद्र रोहित्र वाढविण्याचे कामे प्राधान्याने पूर्ण करा. यंत्रणा अलर्ट मोडवर ठेवा, ग्राहकांचे मोबाईल क्रमांक अपडेट करुन घ्या. उपकेंद्राची रोहित्र क्षमता वाढविण्याचे कामे १० दिवसांत पूर्ण होतील यांची काळजी घेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

## भारत पाक युद्धाच्या पार्श्वभूमीवर साईबाबा संस्थानने घेतला मोठा निर्णय; महत्वाचा आदेश जारी

**शिर्डी । प्रतिनिधी**

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याने संपूर्ण देश हादरला. या हल्ल्यात २६ लोकांचा मृत्यू झाला. पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी भारताने ७ मे २०२५ पासून 'ऑपरेशन सिंदूर' सुरु केले आहे. भारतानं केलेल्या एअर स्ट्राईकनंतर चवताळलेल्या पाकिस्ताननं प्रतिहल्ले सुरु केले आहेत. यामुळे भारत पाक यांच्यात युद्ध स्थिती निर्माण झाली आहे. संपूर्ण देशात हा अलर्ट जारी करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील पर्यटनस्थळांसह प्रमुख मंदिरांच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे. साईबाबा संस्थानने मोठा निर्णय घेतला आहे.

साई बाबा मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनासाठी नवी नियमावली जारी करण्यात आली आहे. साई मंदिरात फुलहार व प्रसाद नेण्यास मनाई आदेश जारी करण्यात आले आहेत. जिल्हा पोलिस अधीक्षक



यांनी साईबाबा संस्थांनसह बैठक घेतली. बैठकीनंतर मंदिर परिसरात पाहणी देखील केली. आगामी धोका लक्षात घेता साईबाबा संस्थानने हा निर्णय घेतल्याचे समजते. पुढील आदेशापर्यंत साईमंदिरात फुलहार व प्रसाद नेण्यास मनाई असेल. साईबाबा संस्थान मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी ही माहिती दिली. पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ मंदिराची सुरक्षा देखील वाढवण्यात आली आहे. मंदिर परिसरात दंगल नियंत्रण पथक आणि कमांडो पोलिस पथक तैनात करण्यात आले आहेत. भारत पाकिस्तान युद्धाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षाच्या कारणास्तव हा बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. पाकिस्तान आणि भारतामधील वाढता तणाव लक्षात घेता देशातील अनेक महत्त्वाच्या शहरांना अलर्ट देण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर शहराला देखील असाच अलर्ट देण्यात आला आहे. जिल्ह्यातील सर्व पर्यटनस्थळी पोलिसांचा बंदोबस वाढवण्यात आला आहे. तसेच जायकवाडी धरणावर येणाऱ्या पर्यटकांना चार दिवसांची बंदी घालण्यात आली आहे.

## मुंबईत 'या' तारखेदरम्यान फटाके आणि रॉकेट फोडण्यावर बंदी!

**मुंबई । प्रतिनिधी**

भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांनी ११ मेपासून ९ जून २०२५ पर्यंत फटाके फोडणे आणि रॉकेट उडवणे यावर बंदी घातली आहे. मुंबई पोलिसांकडून इशारा : या काळात कोणतीही



स्फोटके, फटाके किंवा इतर ध्वनी व प्रकाश निर्माण करणाऱ्या वस्तूंचा वापर केल्यास संबंधित व्यक्तींवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा मुंबई पोलिसांकडून देण्यात आला आहे. मुंबईत सार्वजनिक शांतता आणि सुरक्षेच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. सीमेवरील तणाव, ऑपरेशन सिंदूरसारख्या घडामोडी आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी जबाबदारीने वागावे, असे आवाहन करण्यात आले आहे. नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करावे : या आदेशाचे उल्लंघन केल्यास भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला जाऊ शकतो. त्यामुळे नागरिकांनी फटाके फोडणे किंवा रॉकेट उडवणे टाळून पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# प्रशासनाचा संथ कारभारामुळे लोकसहभागातून केलेला शेतरस्ता मोकळा करण्यासाठी शेतकरी बेजार

**आणि दुसरीकडे प्रशासनाची "सस्ती अदालत" म्हणजे जिल्हा प्रशासनाची प्रसिद्धी मिळवण्यासाठी केलेली स्टंटबाजी : डॉ.गणेश ढवळे**

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

एकीकडे शेतकऱ्यांनी अतिक्रमित शेतरस्ते,पाणंद रस्ते मोकळे व्हावेत ,त्यांना जलद न्याय मिळावा हा उद्देश समोर ठेवून प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या चौथ्या शुक्रवारी सस्ती अदालत हा उपक्रम तहसील कार्यालय, मंडळ मुख्यालयाच्या ठिकाणी राबवला जाणार असून याचा लाभ शेतकऱ्यांना होणार आहे अशी विविध दैनिकातून प्रसिद्धी जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात येऊन स्वतःची पाठ थोपटून घेतली जात आहे. दुसरीकडे लोकसहभागातून तयार केलेले शेत रस्ते मोकळे करून देण्यात यावेत यासाठी वारंवार जिल्हा प्रशासन,तहसील प्रशासन यांच्या दारी खेटे मारून त्यांचे जोडे झिजले आहेत. परंतु त्यांना जिल्हा प्रशासन शेत रस्ता मोकळा करून देण्यास दिरंगाई करत आहे. त्यामुळे एकंदरीतच शेत रस्ते मोकळे करण्यासाठी राबवले जाणारे सस्ती अदालत हा जिल्हा प्रशासनाचा प्रसिद्धी मिळवण्यासाठी स्टंटबाजी असून जिल्हा प्रशासनाने जलद गतीने शेतकऱ्यांना न्याय देऊन शेत रस्ते,पाणंद रस्ते मोकळे करून द्यावेत.तसेच ग्रामीण भागात शेत वस्तीवर जाण्यासाठी दळणवळणाची साधने व मजुरांच्या हाताला काम मिळावे या उदात्त हेतूने सुरू केलेली मातोश्री ग्राम समृद्धी शेत / पाणंद रस्ते योजनेंतर्गत शेत रस्ते पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्यात यावेत.अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे



लिंबागणेशकर यांनी केली आहे.

मुळकवाडी- मसेवाडी शिवरस्ता मोकळा करून देण्यात यावा यासाठी शेतकऱ्यांनी आक्षेप घेतल्यानंतर ३ वर्षांपूर्वी भूमी अभिलेख कार्यालयात २१,००० रुपये मोजणी फीस भरली. त्यानंतर दोन वर्ष भूमी अभिलेखचे कर्मचारी मोजणी करण्यासाठी आलेच नाहीत. सहा महिन्यापूर्वी १ ऑक्टोबर रोजी लिंबागणेश येथे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या अध्यक्षतेखाली महसूल मंडळाची बैठक झाली होती. तेव्हा मसेवाडी येथील ग्रामस्थांनी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना लेखी निवेदन दिल्यानंतर त्यांनी भूमी अभिलेखच्या कर्मचाऱ्यांना आदेश देऊन खुणा निश्चिती करून देण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर खुणा करून दिल्या मात्र दोन तीनशे शेतकऱ्यांपैकी चार ,पाच शेतकऱ्यांना त्या मान्य नसल्याने त्यांनी रस्ता अडवला असून लोक सहभागातून ४-५ लाख रुपये खर्च खर्चून ७० टक्के रस्ता तयार झाला असून केवळ अर्धा किलोमीटर रस्ता बाकी आहे. पावसाळा तोंडावर आला असुन पावसाळ्यात खते ,बि बियाणे, आणि शेतातील शेतीमाल आदी ने आण करण्यासाठी अडचण येते. त्यामुळे पावसाळ्यापुर्वी महसूल प्रशासनाला आम्हाला तातडीने रस्ता मोकळा करून देण्यात यावा अशी आमची मागणी असल्याचे शाकींदर काटकर यांनी सांगितले.

पावसाळ्यात शाळा सुरू झाल्यानंतर शाळकरी मुलांना गुडघाभर चिखलातून शाळेत जायला लागतं. आठवडी बाजार,माळवं, रात्री अपरात्री दवाखान्यात जायचं म्हणलं तरी आम्हाला मोठी अडचण आहे त्यामुळे पावसाळ्या अगोदर रस्ता करण्यात यावा अशी मागणी छाया निर्मळ यांनी केली आहे.

तहसीलदार यांच्या आदेशानुसार भुमि अभिलेख कर्मचाऱ्यांनी करून दिलेल्या खुणा ४-५ शेतकऱ्यांना मान्य नाही म्हणून रस्ता काम रखडले : रामकिसन कदम सरपंच मुळकवाडी

तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी स्वतः भेट देऊन भुमि अभिलेख कर्मचाऱ्यांना ३३ फुट रस्त्यासाठी खुणा करून दिल्या होत्या.२०० शेतकऱ्यांना या मान्य असुन ४-५ शेतकऱ्यांना मान्य नसल्याने त्यांनी काम अडवल्याने ७० टक्के काम पूर्ण झाले असुन ३० टक्के काम अपूर्ण आहे. प्रशासनाने रस्ता मोकळा करण्यास मदत करावी.अशी मागणी सरपंच मुळकवाडी रामकिसन कदम यांनी केली आहे.

ग्रामीण भागात शेतवस्तीवर जाण्यासाठी दळणवळणाची साधने व मजुरांच्या हाताला काम मिळावे या उदात्त हेतूने मातोश्री ग्राम समृद्धी शेत/ पाणंद रस्ते योजना अस्तित्वात आणली.

पावसाळ्यापुर्वी शेत रस्ते पूर्ण हवेत या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले होते.रस्ते मोकळे करण्यासाठी शेतकरी शासनाच्या दरबारी वारंवार चकरा मारत असूनही त्यांना न्याय मिळत नाही. सध्या शेत रस्ते , पाणंद रस्ते मोकळे करण्यासाठी राबवली जाणारी सस्ती अदालत योजना केवळ स्टंटबाजी असून शेतकऱ्यांना प्रशासनाने तातडीने न्याय द्यावा व पावसाळ्यापूर्वी शेत रस्ते, पाणंद रस्ते पूर्ण करण्यासाठी सहकार्य करावे अशी मागणी डॉ . गणेश ढवळे लिंबागणेशकर केली आहे.

CMYK

दैनिक ● epaper.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

रविवार, दि.११ मे २०२५ पान ४

## आज विद्रोही आंबेडकरी जलसा भिमगिताचा कार्यक्रम

### नागरीकांनी उपस्थित रहावे ; सम्यक प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रशांत ससाणे यांचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व बुध्द जयंती निमित्त सम्यक प्रतिष्ठाण बीड आयोजित विद्रोही आंबेडकरी जलसा हा भिमगीत प्रबोधनाचा कार्यक्रम रविवार, ११ मे २०२५ रोजी सायं. ६.३० वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड येथे आयोजित करण्यात आला आहे. हा 'विद्रोही आंबेडकरी जलसा'चे उद्घाटक बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे हे असणार आहेत. तर जलसा कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून बीड सार्वजनीक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रविंद्र तोंडे, कृष्णा पानसंबळ ▶▶ उर्वरित पान २ वर

# भारतीय सैनिकांसाठी आज बीडमध्ये मोटरसायकल तिरंगा रॅली



## देशभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे : शेख निजाम

**बीड । प्रतिनिधी**

पहलगाम हल्ल्यानंतर ऑपरेशन सिंदूर राबवत भारताने पाकिस्तानातील दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त केले. पाकिस्तानच्या प्रत्येक हल्ल्यावर जशास तसे उत्तर भारत देत आहे. भारतीय सैनिकांचे मनोबल वाढविण्यासाठी दि.११ मे २०२५ रोजी सकाळी दहा वाजता बीडमध्ये मोटार सायकल



रॅली काढण्यात येणार आहे. एक देशभक्त, भारतीय नागरिक म्हणून ही रॅली काढण्यात येणार आहे. यामध्ये देशभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शेख निजाम यांनी केले आहे.

भारतीय सैनिकांनी जम्मू काश्मीर मधील पहलगाम हल्ल्यानंतर 'ऑपरेशन सिंदूर' राबवत शत्रू राष्ट्र असलेल्या पाकिस्तानवर एअरस्ट्राइक करत प्रत्युत्तर देऊन अनेक दहशतवादी अड्डे ▶▶ उर्वरित पान २ वर

## द्वारकधीश मित्र मंडळाचे आव्हान देशभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे

**बीड । प्रतिनिधी**

पहलगाम हल्ल्यानंतर ऑपरेशन सिंदूर राबवत भारताने पाकिस्तानातील दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त केले. पाकिस्तानच्या प्रत्येक हल्ल्यावर जशास तसे उत्तर भारत देत आहे. भारतीय सैनिकांचे मनोबल वाढविण्यासाठी दि.११ मे २०२५ रोजी सकाळी दहा वाजता बीडमध्ये मोटार सायकल रॅली काढण्यात येणार आहे. एक




देशभक्त, भारतीय नागरिक म्हणून ही रॅली काढण्यात येणार आहे. यामध्ये देशभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आव्हान द्वारकाधीश मित्र मंडळाने केले यांनी केले आहे.

भारतीय सैनिकांनी जम्मू काश्मीर मधील पहलगाम हल्ल्यानंतर 'ऑपरेशन सिंदूर' राबवत शत्रू राष्ट्र असलेल्या ▶▶ उर्वरित पान २ वर

## गेवराईच्या आगारात पाच 'लालपरी' बस दाखल;

## आमदार पंडितांनी उपस्थितीत बसचे लोकार्पण, आमदारांचा लालपरीतुन प्रवास

**गेवराई । प्रतिनिधी**

परिवहन महामंडळाने बीडमधील गेवराईच्या आगाराला पाच नविन 'लालपरी'बस अखेर उपलब्ध करून दिल्या आहेत. आ. विजयसिंह पंडित यांच्या उपस्थितीत या बसची विधिवत पूजन करून प्रवाशांच्या सेवेत सुपूर्द करण्यात आल्या. दरम्यान आमदार यांच्यासाठी राखीव असलेल्या असनावर बसून आ. विजयसिंह पंडितांनी काही



किलोमीटर प्रवास देखील केला.

गेवराई विधानसभा मतदार संघाचे आ. विजयसिंह पंडित यांचे गेवराई आगारासाठी पाच नवीन लालपरी बस उपलब्ध कराव्यात यासाठी प्रयत्न सुरू होते. त्यांच्या प्रयत्नाला अखेर यश मिळाले असून,काल उशिरा गेवराई आगारात पाच नविन'लालपरी'बस दाखल झाल्या. शनिवार (ता.१०) मे रोजी ▶▶ उर्वरित पान २ वर

## लोकनेते सुंदरराव सोळंके कारखान्याचे इन्स्टुमेंटेशन मॅनेजर रामेश्वर सदरे यांना बेस्ट इन्स्टुमेंटेशन मॅनेजर पुरस्कार

**माजलगाव । प्रतिनिधी**

लोकनेते सुंदर राव सोळंके सहकारी साखर कारखानाचे इन्स्ट्रुमेंटेशन मॅनेजर मा. श्री रामेश्वर पांडुरंगराव सदरे यांना कोजनरेशन असोसिएशन ऑफ इंडिया तर्फे बेस्ट इन्स्ट्रुमेंटेशन मॅनेजर या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.




कोजनरेशन असोसिएशन ऑफ इंडिया तर्फे सण २०२४ करिता देण्यात येणारा उत्कृष्ट सामग्री (इन्स्टुमेंटेशन) व्यवस्थापक (Best Instrumentation Manager ) (सहकारी व जादा बॉयलर क्षमता गट) हा पुरस्कार लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना,तेलगाव चे इन्स्टुमेंटेशन मॅनेजर, मा.श्री रामेश्वर पांडुरंग सदरे साहेब यांना प्राप्त झालेला आहे. हा पुरस्कार सोहळा हॉटेल ऑर्चिड, बाणेर, पुणे येथे दिनांक १९ एप्रिल २०२५ शनिवार रोजी संपन्न झाला. त्यावेळी पुरस्कार देताना देशाचे माजी केंद्रीय कृषिमंत्री तथा खासदार व कोजनरेशन असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष मा.श्री शरदचंद्रजी पवार साहेब,महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री मा.श्री बाबासाहेब पाटील साहेब, महाराष्ट्र राज्याचे माजी ग्रामविकासमंत्री मा.श्री हर्षवर्धन पाटील साहेब, कोजनरेशन असोसिएशन ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष श्री मा.श्री जयप्रकाशजी दांडेगावकर साहेब, तसेच तसेच सत्कारमूर्ती श्री रामेश्वर सदरे यांचे वडील श्री पांडुरंग हरिभाऊ सदरे आदी मान्यवर उपस्थित होते .श्री रामेश्वर पांडुरंग सदरे साहेब यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## हिंदू-मुस्लिमांचं श्रध्दास्थान हजरत मौलाली बाबांचा यात्रोत्सव

**कडा । प्रतिनिधी**

कडा येथील ग्रामदैवत तथा सर्वधर्मियांचं श्रध्दास्थान म्हणून नावलौकिक असलेल्या हजरत मौलाली बाबांचा यात्रोत्सव मंगळवार ६ मे पासून सुरू झाला असून सोमवारी दि.१२ मे रोजी मोठ्या उत्साहात यात्रा-उरूस संपन्न होणार आहे.आष्टी तालुक्यातील कडा हिंदू -मुस्लिम एकोपा जोपासणारं गाव म्हणून मराठवाड्यात नावलौकिक आहे. याठिकाणचा यात्रोत्सव सामाजिक एकतेचे प्रतीक मानला जातो. कडीनदीच्या किनारी ग्रामदैवत तथा सर्वधर्मियांचं श्रद्धास्थान ▶▶ उर्वरित पान २ वर



## वारकरी संप्रदायाच्या भजनाचा सूर्य उगवणारे संत बंकटस्वामी महाराज : चैतन्य महाराज निंबोळे

## जातीपाती विसरून हिंदू नावाखाली सर्वजण एकत्र या: चैतन्य महाराज निंबोळे

**नेकनूर । प्रतिनिधी**

वारकरी संप्रदायाच्या भजनाचा सूर्य उगवणारे संत बंकटस्वामी महाराज आहेत. गायन आणि वादन कला नाही तर साधना आहे. ज्या साधनेच्या जोरावर देव आपलासा करता येतो हे स्वामी महाराज यांनी सांगितले. असे प्रतिपादन श्री ह भ प चैतन्य महाराज निंबोळे यांनी केले.संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवात तिसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्पगुताना ते बोलत होते. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत लक्ष्मण



महाराज मेंगडे, मुकुंदराज संस्थांचे मठाधिपती किसन महाराज पवार, गाथा कंठस्थ मारुती म हाराज चोरमले , अर्जुन महाराज शिंदे,जनार्धन महाराज बांगर,श्री ह भ प नाना महाराज कदम. सुरेश महाराज जाधव, यांच्यासह हजारो भावी भक्तांची उपस्थिती होती.. ▶▶ उर्वरित पान २ वर

## सुभाषराव गायगवे यांचे दु:खद निधन



**माजलगाव । प्रतिनिधी**


येथील तेलाचे प्रतिष्ठित व्यापारी सामाजिक कार्यकर्ते सुभाषराव अण्णा गायगावे वय ६८ यांचे अल्पशा आजाराने दिनांक १० मे रोजी दुपारी ४:३० वाजता दुःखद निधन झाले आहे त्यांच्या पार्थिवावर दिनांक ११ मे रोजी सकाळी ८ वाजता मंगलनाथ स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. सुभाषराव अण्णा गायगाव हे अत्यंत मनमिळावू शांत धार्मिक वृत्तीचे होते आडत व्यापारी तेलाचे व्यापारी म्हणून सर्वत्र परिचित होते गजानन गणेश मंडळाचे हे संस्थापक सदस्य होते कुणाच्याही सुख दुःखात सहभागी होणारे व्यक्तिमत्व म्हणून सर्वत्र परिचित होते सामाजिक कार्याची त्यांना आवड होती. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ, दोन बहिणी, दोन मुले, दोन मुली,सुना नातवंडे असा परिवार आहे.

## बंकटस्वामी महाराज पुण्यतिथी उत्सवात रक्तदान शिबिर व मोफत आरोग्य शिबिर

### •आज मोफत आरोग्य शिबिर

**नेकनूर । प्रतिनिधी**

वारकरी संप्रदायाचे भक्ती सूर्य बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवात भव्य रक्तदान शिबित व मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आज मोफत आरोग्य तपासणी शिबिर होणार आहे. दि १२ मे २०२५ रोजी रक्तदान



शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे मागच्या वर्षी साडेतीनशे रक्तदात्यांनी रक्तदान केले होते यावर्षी ५०० पेक्षा जास्त रक्त दाते रक्तदान करणार आहेत.. या रक्तदान शिबिरामध्ये बंकट स्वामी भक्त परिवारातील सर्वांनी आवर्जून रक्तदान करावे असे आवाहन अन्नदान समिती विश्वस्त, आणि महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्यावतीने करण्यात आले आहे..



आज दिनांक ११ मे २०२५ रोजी मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे डॉ.दत्ता जोगदंड व डॉ.सोनाली जोगदंड यांच्या उपस्थितीमध्ये हे आरोग्य शिबिर संपन्न होणार आहे.. गरजूंनी या आरोग्य शिबिरातही लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे..

## शिवणीमध्ये बुद्ध जयंती महोत्सव

**बीड । प्रतिनिधी**

या जगाला प्रज्ञा, शिल, करुणेची शिकवण देणाऱ्या तथागत सिध्दार्थ गौतम बुद्ध यांच्या २५६९ व्या जयंती निमित्ताने तथागत बुद्ध रुप प्रतिष्ठापना व अनावरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा बुद्ध जयंती महोत्सव बीड तालुक्यातील शिवणी येथील महाविहार धम्मभूमी डॉ.भदन्त आनंद कौसल्यायन नगर, येथे सोमवार (दि.१२) मे रोजी संपन्न होत आहे. प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था,बीड विनीत बुद्ध जयंती महोत्सवात उपस्थित रहावे असे आवाहन मुख्य संयोजक भिक्खु धम्मशिल थेरो यांनी केले आहे. प्रसिध्दी दिलेल्या पत्रकात म्हंटले आहे की, कार्यक्रमाचे



उदघाटक डॉ.भिक्खु उपगुप्त माथेरो तर अध्यक्ष म्हणून भिक्खु इंदवंस्स, प्रमुख उपस्थिती भिक्खु चंद्रमुणी असणार आहेत. प्रमुख धम्मदेसना भिक्खु महाकाश्यप थेरो, भिक्खु धम्मघोष, भिक्खु पय्यावर्धन तर प्रमुख पाहुणे म्हणून बीड ▶▶ उर्वरित पान २ वर

